सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/शै.वि.-४/२०२४/2614 दिनांक : 01 JUL 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व संस्था, पुणे विभाग, पुणे

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी स्वयंनिर्वाहित (Self-finance) राष्ट्रीस सेवा योजनेचे एकक (Unit) मागणीचे प्रस्ताव सादर करणेबाबत.**

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.रासेयो-२०२४/प्र.क्र.५०/रासेयो कक्ष, दिनांक २७ जून,२०२४
२. संचालनालयाचे पत्र क्र.ई.ऑ.फा.नं.डीटीईएम-डी९०प्लान/६३/२०२४-डेस्क९दि.२९.०७.२०२७

उपरोक्त विषयास अनुसरून सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजना एकक (Unit) मागणीचे प्रस्ताव सादर करण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये शासनाने व संचालनालयाने निर्देशित केले आहे.

त्यास असनुसरून या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात येते की, **इच्छुक अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी व पदविका** संस्थांचा स्वयंनिर्वाहित राष्ट्रीय सेवा योजनचे एकक (Unit) सुरू करण्याची मागणीबाबतची माहिती (इंग्रजीमध्ये) सोबत दिलेल्या गुगल फॉर्ममध्ये दि.०४.०७.२०२४ पर्यंत सायं ०५.०० वाजे पर्यंत भरण्यात यावी. सदर गुगल फॉर्म मध्ये माहिती भरलेल्या संस्थांचाच (विहीत वेळेत माहिती सादर केलेल्या संस्थांचाच) स्वयंनिर्वाहित (Self-finance) राष्ट्रीस सेवा योजनेचे एकक (Unit) सुरू करणेबाबतचा प्रस्ताव संचालनालयायस सादर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

गुगल फॉर्म -https://forms.gle/yMAbsbYfBhkK6oDj7

सोबत- संदर्भिय पत्रे

**(डॉ. द. व्यं. जाधव)**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरिता.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४९०, ६८५९७४०९ ई-मेल-desk9@dtemaharashtra.gov.in,
वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

E-office file No. DTEM-D९०PLAN/६३/२०२४-DESK ९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी स्वयंनिर्वाहित (Self-finance) राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक (Unit) मागणीचे प्रस्ताव सादर करणेबाबत..

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.: रासेयो-२०२४/ प्र.क्र.५०/ रासेयो कक्ष, दिनांक २७ जून,२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजन एकक (Unit) मागणीचे प्रस्ताव सादर करण्याबाबत संदर्भाधिन शासन पत्रान्वये निर्देशित केले आहे.

त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील इच्छूक अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी व पदविका संस्थांचा स्वयंनिर्वाहित राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक (Unit) सुरु करण्याची मागणीबाबतची माहिती खालील नमुन्यात एक्सेल शीट मध्ये (इंग्रजीमध्ये) एकत्रित करुन दि. ४/०७/२०२४ पर्यत संचालनालयास सादर करण्यात यावी.

| स्वयंनिर्वाहित राष्ट्रीय सेवायोजने अंतर्गत एकक (Unit) मागणी प्रपत्र | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | जिल्हा | संस्थेचे नांव | ठिकाण | डीटीई कोड नंबर | रासेयो एकक विद्यार्थी संख्या (५०/१००) | प्राचार्याचे नांव | ई-मेल आयडी | मोबाईल नंबर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

आपणामार्फत सादर केलेल्या यादीत नमूद संस्थांचाच स्वयंनिर्वाहित (Self-finance) राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक (Unit) सुरु करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

Signed by
Shrikant K Madawi
Date: 29-06-2024 17:46:57
(श्रीकांत मडावी)
सहाय्यक संचालक(तां),
तंत्र शिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई

मंत्रालयीन सेवा

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.**
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

क्रमांक: रासेयो-२०२४/प्र.क्र. ५०/रासेयो कक्ष दिनांक: २७ जून, २०२४

प्रति,
**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
**राष्ट्रीय सेवा योजना,**
**सर्व अकृषी विद्यापीठे/ कृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/संस्था/संचालनालये, महाराष्ट्र राज्य.**

**विषय**: सन २०२४-२५ साठी रासेयो एकक मागणीचे महाविद्यालयांचे प्रस्ताव पाठविणेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांना कळविण्यात येते की सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठीचे रासेयो एकक मागणीचे महाविद्यालयांचे प्रस्ताव आपल्या विद्यापीठाकडे मान्यतेस्तव पाठविण्यात आलेले आहेत. बहूतांश विद्यापीठाची रासेयो सल्लागार समितीची बैठक प्रलंबित असल्यामूळे सदर प्रस्ताव मान्यतेस्तव प्रलंबित आहेत. सद्यस्थितीत शैक्षणिक वर्षाची सुरुवात झालेली आहे.

या पत्राव्दारे आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ/संचालनालये यांच्या अधिनस्त अनुदानित व स्वंयनिर्वाहीत महाविद्यालयांचा रासेयो एकक मागणी बाबतचे महाविद्यालयाचे प्रस्ताव विद्यापीठनिहाय एकत्रीत रित्या (एक्सेल शीटमध्ये) राज्य शासनाच्या या कार्यालयास तात्काळ **दि.०५ जुलै, २०२४** अखेर पर्यत पाठविण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी. विहित मुदतीत रासेयो एकक मागणीचे महाविद्यालयांचे प्रस्ताव प्राप्त न झाल्यास, आपल्या विद्यापीठाची माहिती निरंक समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल. याबाबतची सर्वस्व जवाबदारी कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांची राहील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. निलेश मो. पाठक)
राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन